जिल्हा परिषद,जालना (शिक्षण विभाग)
प्राथमिक शिक्षण सेवक भरती सन 2009-10
जाहीर प्रगटन

प्राथमिक शिक्षण सेवक केंद्रिय भरती पूर्व परीक्षेव्दारे प्राथमिक शिक्षण सेवकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांचे मार्फत जि.प.जालना अंतर्गत 31/05/2011 पर्यंत रिक्त होणारी पदे विचारात घेऊन मराठी माध्यम 929 व उर्दु माध्यम 34 पदे भरण्यासाठी दि.05/02/2010 रोजी जाहिरात देण्यात आली होती.

सदर जाहिरात अनुषंगाने दिनांक 02/05/2010 रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत परीक्षा घेण्यात येऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे कडून जाहीरातीत अधिसूचित पदाप्रमाणे 929 व उर्दु 34 उमेदवरांची निवड यादी जिल्हा परिषद, जालना कडे पाठविण्यात आली.

सदर निवड यादीतील उमेदवारांच्या म.रा.प.पुणे यांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे जिल्हा परिषद, जालना अंतर्गत दिनांक 17/06/2010 ते 22/06/2010 या कालावधीत मुलाखत / कागदपत्र पडताळणी करण्यात येऊन दिनांक 24/06/2010 रोजी निवड पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

शिक्षण सेवक पदे भरण्यासाठी दिनांक 31/05/2011 पर्यंत रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेऊन जाहीरातीत पदे अधिसुचित करण्यात आली आहेत.ही बाब संबंधित (निवड पात्र) उमेदवारांनी प्रकर्षाने विचारात घ्यावी त्यास अनुसरुन आजमितीस जिल्हा परिषद, जालना अंतर्गत प्राथमिक शिक्षक संवर्गात रिक्त असलेली पदे विचारात घेऊन निवड यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही समुपदेशनाव्दारे खालील वेळा पत्रकानुसार करण्यात येणार आहे.

अ.क्र.	दिनांक	माध्यम	प्रवर्ग	तपशिल
1	11/07/10 रविवार	मराठी - 80%	खुला प्रवर्ग	1) CET परीक्षेत 151 गुण व जन्मदिनांक16 जून 1984 पर्यंतच्या जि.प.जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या सर्व निवड पात्र महिला उमेदवार. 2) CET परीक्षेत 150 गुण व जन्म दिनांक 19 फेब्रुवारी 1989 पर्यंतच्या खुल्याप्रवर्गातून निवड झालेल्या सर्व निवड पात्र मागासवर्गीय महिला उमेदवार
			सर्व मागास प्रवर्ग	जि.प.जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले व मुलाखतीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेल्या सर्व निवड पात्र महिला उमेदवार.
			अपंग	जि.प.जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले सर्व अपंग निवड पात्र पुरुष व महिला उमेदवार.
		इंग्रजी- 20 %	खुला प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या सर्व निवड पात्र महिला उमेदवार.
			सर्व मागास प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या व मुलाखतीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेल्या सर्व निवड पात्र महिला उमेदवार.
			अपंग	जि.प.जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले सर्व अपंग निवड पात्र पुरुष व महिला उमेदवार.
		उर्दू	खुला प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले सर्व निवड पात्र उमेदवार.
			सर्व मागास प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले व मुलाखतीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले सर्व निवड पात्र उमेदवार.
2	12/07/10 सोमवार	मराठी - 80%	खुला प्रवर्ग	1)CET परीक्षेत 154 गुण व जन्मदिनांक 05 मे 1985 पर्यंतचे जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले सर्व निवड पात्र पुरुष उमेदवार. 2) CET परीक्षेत 152 गुण व जन्म दिनांक 22 फेब्रुवारी 1990 पर्यंतचे खुल्याप्रवर्गातून निवड झालेल्या सर्व निवड पात्र मागासवर्गीय पुरुष उमेदवार.
			सर्व मागास प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले व मुलाखतीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले सर्व निवड पात्र पुरुष उमेदवार.
		इंग्रजी- 20 %	खुला प्रवर्ग	जि.प. जालना येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले सर्व निवड पात्र पुरुष उमेदवार.
			सर्व मागास प्रवर्ग	जि.प.जालाा येथे प्राथमिक शिक्षण सेवक पदाच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेले व मुलाखतीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले सर्व निवड पात्र पुरुष उमेदवार.

1) उपस्थित उमेदवारांना रिक्त पदाच्या उपलब्धतेतुसार गुणवत्ता व आरक्षण लक्षात घेता उमेदवारांच्या पसंतीनुसार त्याच दिवशी पदस्थापना व नियुक्ती आदेश देण्यात येतील.

2) मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांची जात प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निवड करण्यात आलेली आहे. म्हणजेच सद्यस्थितीत ज्या मागास प्रवर्गातील उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यांतरच त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येतील त्यामुळे जात वैद्यता प्रमाणपत्र नसलेले मागास प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक 11/07/10 व 12/07/10 च्या समुपदेशनासाठी उपस्थित राहू नये.

3) खुल्या प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे गुण वर दर्शविल्याप्रमाणे नाहीत त्या उमेदवारांना जस जसे पद रिक्त होतील त्यानुसार पदस्थापना देण्यात येईल.

यानुसार उपरोक्त वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे निवड पात्र उमेदवारांनी त्यांना नियत केलेल्या दिनांकास सकाळी 10.00 वाजता जिल्हा परिषद, जालना येथील कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जालना येथे न चुकता उपस्थित रहावे. नियत केलेल्या दिनांकास संबंधित निवड झालेले उमेदवार उपस्थित न झाल्यास संबंधित उमेदवारास समुपदेशनानंतर रिक्त राहीलेल्या जागेवर पदस्थापना देण्यात येईल.

जिल्हा परिषद, जालना अंतर्गत तालुका निहाय रिक्त जागांचा तपशील संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे नोटिस बोर्ड वर डकविण्यात आलेला असुन www.Jalna.Nic.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जालना